लोकमत



साताऱ्यातील यशोदा टेक्निकल कॅम्पसमध्ये सायबर जनजागृती करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. विक्रम पाटील, डॉ. सरिता बलशेटवार, शीतल वाघमारे उपस्थित होत्या.

# यशोदा टेक्निकल कॅम्पसमध्ये सायबर जनजागृती सप्ताह साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**सातारा :** डिजिटल युगात सायबर सुरक्षा आणि जबाबदार ऑनलाइन वापराचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी यशोदा टेक्निकल कॅम्पस यांच्या संगणक अभियांत्रिकी विभागातर्फे सायबर जागृती सप्ताह उत्साहात साजरा केला.

हा उपक्रम क्विक हील फाउंडेशन आणि सायबर सुरक्षा क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला होता. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला.

प्राचार्य डॉ. विक्रम पाटील, डॉ. सरिता बलशेटवार, समन्वयक शीतल वाघमारे यांनी नियोजन केले. सायबर सेफ क्लबच्या सदस्यांनी आयोजन आणि समन्वयाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली. (वा. प्र.)

Satara Main
Page No. 04 November 07, 2025
Powered by : erelego.com